सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल

## श्री. कासू ब्रह्मानंद रेड्डी

यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

१४ मार्च १९८८

सभापती महोदय, अध्यक्षमहाराज व सन्माननीय सदस्य,

राज्य विधानमंडळाच्या, १९८८ मधील या पहिल्या अधिवेशनात आपले स्वागत करताना मला आनंद होत आहे. महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आज प्रथमच मला आपल्यासमोर बोलण्याची संधी मिळत आहे. महाराष्ट्राच्या जनतेला माझ्या हार्दिक शुभेच्छा देत असताना आपल्या सर्वांच्या सहकार्याने जनतेची सेवा करण्याचा माझा सतत प्रयत्न राहील, अशी मी आपल्याला खात्री देऊ इच्छितो.

२. या वर्षी, राज्याच्या अनेक भागांत समाधानकारक पाऊस झाला असला तरीही, राज्याच्या १३ जिल्ह्यांमधील विशेषत: नागपूर विभागामधील, ६,४०० गावांना अनियमित व अपुरा पाऊस झाल्यामुळे, १९८७ च्या खरीप हंगामामध्ये नुकसानीची झळ पोहोचली आहे. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी अनेक प्रकारच्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत आणि भारत सरकारने या कामासाठी जून १९८८ पर्यंत १०४.१९ कोटी रुपयांच्या मर्यादेपर्यंतचे सहाय्य मंजूर केले आहे. त्याचप्रमाणे, १९८७ च्या सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये झालेल्या पावसाचा शेतकऱ्यांना जास्तीतजास्त लाभ घेता यावा यासाठी १९.९३ लाख शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी खते, बी-बियाणे यांच्या छोटया पिशव्या (मिनी-किटस्) मोफत पुरवण्यात आल्या आहेत. टंचाईग्रस्त भागातील सुमारे १.४० लाख विद्यार्थ्यांना या वर्षी मुख्यमंत्र्यांच्या मदत निधीतून सुमारे ९० लाख रुपयांचे अर्थसहाय्य घेऊन परीक्षा-फी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

३. लागोपाठ चार वर्षे अवर्षणाचा तडाखा बसल्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. असे असूनही शासनाने विकासाची गती कमी होऊ दिलेली नाही. १९८८–८९ ची वार्षिक योजना २,४३० कोटी रुपयांची आहे. त्यापैकी, राज्याच्या

निरनिराळ्या भागांतील प्रादेशिक अनुशेष दूर करण्याकरता ४०० कोटी रुपयांची योजना करण्यात आली आहे. १९८७–८८ साली, या कारणासाठी ३०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

४. २०– कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर आपल्या राज्याने फार मोठा भर दिला असून, १९८६–८७ मध्ये आपले राज्य या कार्यक्रमात संपूर्ण देशात पहिल्या क्रमांकावर होते, हे सांगण्यास मला आनंद होत आहे. या वर्षी देखील हे आघाडीचे स्थान कायम राखण्यासाठी माझ्या शासनाने सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत.

५. माझ्या शासनाने या वर्षी प्रथमच सातव्या पंचवार्षिक योजनेचा मध्यावधी आढावा घेतला आहे. या आढाव्याचा अहवाल विधानमंडळाला सादर करण्यात येईल. मध्यावधी आढाव्यावरील चर्चेच्या वेळी, सातव्या योजनेमध्ये राज्याने आतापर्यंत केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन करण्याची आणि योजनेच्या उरलेल्या वर्षांकरता या कामात काही सुधारणा सुचवण्याची संधी आपणा सर्वांना मिळेल.

६. राज्यातील ग्रामीण जनतेला पिण्याच्या पाण्याचा पुरेसा पुरवठा करण्याबाबत माझे शासन वचनबद्ध आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत एकूण २०,००० गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचे लक्ष्य आहे आणि त्यासाठीच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून १९८८ च्या जानेवारीच्या अखेरपर्यंत १०,९११ गावांना पिण्याचे पाणी पुरवण्यात आले आहे. पुढील वर्षामध्ये आणखी ५,००० गावांना या योजनेखाली आणण्याचे योजले आहे. नारू, फ्लुरोसिस, पाण्यातील मचूळपणा आणि जास्तीचे लोह यासंबंधीच्या समस्या दूर करण्यासाठी, एक राष्ट्रीय तंत्रज्ञानविषयक मोहीम हाती घेण्यात आली असून राज्याच्या सातारा व लातूर जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम राबवण्यात येणार आहे.

७. नागरी क्षेत्रासाठी पाणीपुरवठ्याच्या ७९ योजनांचे काम चालू आहे, त्यांपैकी १० योजना मार्च १९८८ पर्यंत आणि २८ योजना मार्च १९८९ पर्यंत पूर्ण होतील. या योजनांकरता आयुर्विमा महामंडळ, आयुर्विमेतर महामंडळ आणि युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया या तीन संस्थांनी मिळून येत्या ५ वर्षांत १०० कोटी रुपयांचे जादा कर्ज देण्याचे मान्य केले आहे. ठाणे आणि कल्याण महानगरपालिका क्षेत्र आणि आसपासच्या महानगरपालिका आणि खेडी यांना पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या महाराष्ट्र पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाचे काम जवळजवळ पूर्ण होत आले असून रुपये १६२ कोटी इतक्या खर्चाचा हा प्रकल्प जागतिक बँकेच्या सहाय्याने हाती घेण्यात आला आहे.

८. रोजगार हमी योजनेला प्रारंभ झाल्यापासून, मार्च १९८७ च्या अखेरपर्यंत सुमारे १,६५० कोटी रुपये खर्च करून जवळजवळ २०० कोटी श्रमदिवसांचा रोजगार निर्माण

करण्यात आला आहे. या वर्षी सुमारे २६५ कोटी रुपये खर्च करून १७.१५ कोटी श्रमदिवस इतका रोजगार निर्माण केला जाईल, अशी अपेक्षा आहे. अल्प व अत्यल्प जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीत रोजगार हमी योजनेखाली विहिरी खोदण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचे माझ्या शासनाने ठरवले आहे. केंद्रपुरस्कृत ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम या योजनांच्या द्वारेही रोजगार निर्माण करण्याच्या कामाला मदत होत आहे.

९. पर्यायी ऊर्जा साधने उपयोगात आणण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यात जोरदारपणे होत आहे. आतापर्यंत २ लाखांहूनही अधिक बायोगॅस संयंत्रे बसवण्यात आली आहेत. आपल्या राज्याने या कार्यक्रमासाठी असलेले सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दलचे प्रथम पारितोषिक लागोपाठ ३ वर्षे पटकावले आहे, हे सन्माननीय सदस्यांना सांगताना मला मनापासून आनंद होत आहे व याही वर्षी आपण आघाडीवर राहू, अशी आशा आहे.

१०. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, महाराष्ट्र कृषि-औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी तेलबिया उत्पादक महासंघ व महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ यांना माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कार मिळाले आहेत, हे सांगताना मला आनंद होत आहे.

११. शासनाच्या प्रयत्नांनुसार शेतकऱ्यांनी सुधारित शेती पद्धतींचा अवलंब केला, तसेच ज्वारीच्या सुधारलेल्या संकरित बियाणांचा वापर केला आणि त्यामुळे, १९८७-८८ वर्षात राज्यामध्ये खरीप ज्वारीचे कधी नव्हते एवढे, ३७ लाख टनांहूनही अधिक विक्रमी उत्पादन झाले आहे.

१२. पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या क्षेत्रातील नवीन पाटबंधारे प्रकल्पांमधून आठमाही पद्धतीने जलसिंचन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे; आणि आता हा निर्णय अशा क्षेत्रातील ज्या प्रकल्पांचे काम सुरू आहे अशा सर्व प्रकल्पांना लागू करण्याचे ठरविले आहे. या जलसिंचन पद्धतीचा अवलंब केल्यामुळे मुळा प्रकल्पाच्या मुळा उजवा तट कालव्याखालील सुमारे १९,१०९ हेक्टर इतक्या अधिक जमिनीला पाणी मिळेल अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे भीमा (उजनी) प्रकल्पालासुद्धा ही आठमाही पीकपद्धती लागू करण्याचे ठरवण्यात आले आहे आणि त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ५०,००० हेक्टर अधिक जमीन पाण्याखाली आणता येईल अशी अपेक्षा आहे.

१३. शासनाने, तुषार/ठिबक जलसिंचन संच बसवण्यासाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याची पथदर्शी योजना गेल्या वर्षी चालू केली होती. ही योजना सातव्या पंचवार्षिक

योजनेच्या उरलेल्या कालावधीतही अंमलात राहील. या योजनखाली, अल्प आणि अत्यल्प जमीन असणारे शेतकरी, २ ते ६ हेक्टर जमीन असणारे शेतकरी आणि ६ हेक्टरपेक्षा अधिक जमीन असणारे शेतकरी यांना अनुक्रमे, रुपये २०,०००, रुपये १४,००० आणि रुपये ८,००० इतक्या मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य देण्यात येईल.

१४. १९८६-८७च्या कापूस हंगामात, एकाधिकार कापूस खरेदी योजनेला सुमारे १०० कोटी रुपयांचा नफा झाला आणि त्यामधील ७५ कोटी रुपये कापूस उत्पादकांना बोनस म्हणून वाटण्यात आले. या वर्षाच्या हंगामाकरिता शासनाने कापूस उत्पादकांना आगाऊ बोनस म्हणून दर क्विंटलमागे २०० रुपये दिले आहेत.

१५. विदर्भ आणि मराठवाड्याच्या मागास भागातील ८ साखर कारखान्यांनी १९८७-८८ पर्यंतच्या नेमून दिलेल्या ३९ महिन्यांच्या कालावधीत, उत्पादनाला सुरुवात केली असून अशाप्रकारे संपत समितीच्या प्रोत्साहन योजनेनुसार सहाय्य मिळण्यास ते पात्र ठरले आहेत. माझ्या शासनाने एकूण ३७ कोटी रुपये इतके वाढीव भाग-भांडवल देण्याचे जे सढळ धोरण स्वीकारले होते, त्याचे हे फलित आहे. राज्य शासनाने ऊस विकास निधीमधून वित्तीय सहाय्य मिळण्याकरता ६८ अर्जांची केंद्राकडे शिफारस केली होती, त्यापैकी, भारत सरकारने, ३८ कोटी रुपये इतक्या सहाय्याचा अंतर्भाव असलेले ४३ अर्ज आतापर्यंत मंजूर केले आहेत.

१६. मागील वर्षातील अवर्षणाच्या परिस्थितीमुळे, अनेक साखर कारखाने दुराव्याची रक्कम कमी पडत असल्याने आर्थिक अडचणीत सापडले होते. अशा कारखान्यांकरिता राज्य सहकारी बँकेने दिलेल्या ३७ कोटी रुपये कर्जाला "थक हमी" देण्याचा महत्त्वाचा निर्णय माझ्या शासनाने घेतला आहे. त्यामुळे ३२ साखर कारखान्यांना या वर्षाच्या ऊस गळिताच्या हंगामाचा पुरेपूर लाभ घेणे शक्य झाले आहे.

१७. सुताचे वाढलेले भाव आणि वस्त्रनिर्माण उद्योगामध्ये आलेली सर्वसाधारण मंदी यांमुळे राज्यातील हातमाग आणि यंत्रमाग उद्योगापुढे निर्माण झालेल्या आर्थिक समस्यांची माझ्या शासनाला जाणीव आहे. हातमाग क्षेत्रात तयार होणाऱ्या जनता कापडावर देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यात दर चौरस मीटरमागे २ रुपयांवरून ३ रुपयांपर्यंत वाढ करण्यात यावी, अशी विनंती माझ्या शासनाने भारत सरकारला केली होती. याबाबतीत माननीय केंद्रीय वित्तमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात हे अर्थसहाय्य दर चौरस मीटरमागे २ रुपयांवरून २.७५ रुपयांपर्यंत वाढविण्याची जी घोषणा केली आहे, तिचे मी स्वागत करतो. माझ्या शासनाने सातत्याने प्रयत्न केल्यामुळे, भारत सरकारने राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) यांच्यामार्फत

यंत्रमाग उद्योगाला सढळपणे कर्ज देण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्याचप्रमाणे यंत्रमाग क्षेत्राला मदत करण्यासाठी सुताचा पुरवठा करणे, विजेची कनेक्शने देणे, यंत्रमागांची नोंदणी करणे आणि यंत्रमाग महामंडळाला सहाय्य देणे, यांसारख्या अनेक उपाययोजनाही माझ्या शासनाने सुरू केल्या आहेत.

१८. माझ्या शासनाने, जागतिक बँकेच्या सहाय्याने वर्धा जिल्ह्यातील सहकारी सूत गिरणीला वित्तपुरवठा केला होता. त्या गिरणीने या वर्षापासून उत्पादनास सुरुवात केली आहे. उभारणीचे काम चालू असलेल्या सहकारी सूत गिरण्यांच्या बाबतीत, माझ्या शासनाने, या गिरण्यांना भाग-भांडवलासाठी ६.३५ कोटी रुपये इतके जादा वित्तसहाय्य मंजूर केले आहे. याव्यतिरिक्त, कापूस एकाधिकार योजनेखाली निर्माण केलेल्या भांडवल उभारणी निधीतून ६.९५ कोटी रुपयांचे वित्तसहाय्यही त्यांना उपलब्ध करून दिले आहे.

१९. ठाणे जिल्ह्यामध्ये, निमखाऱ्या पाण्यातील एक मत्स्यसंवर्धक विकास अभिकरण आणि पुणे, सातारा अणि सांगली जिल्ह्यांमध्ये गोड्या पाण्यातील तीन मत्स्यसंवर्धक विकास अभिकरणे स्थापन करण्याचे ठरविण्यात आले आहे.

२०. यावर्षी, राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाच्या सहाय्याने २८० लाख रुपये खर्चाचे ७ कुक्कुटपालन प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत आणि ६०० लाख रुपये इतका खर्च येणाऱ्या आणखी १५ प्रकल्पांची शिफारस त्या महामंडळाकडे करण्यात आली आहे.

२१. या वर्षी, २९ फेब्रुवारी १९८८ पर्यंत ५१२ खेड्यांना वीज देण्यात आली असून १,०५,४९२ कृषिपंपांना यापूर्वीच वीजपुरवठा करण्यात आला आहे. राज्याच्या टंचाईच्या व अवर्षणप्रवण क्षेत्रामधील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या योजनांना अग्रक्रम देऊन वीजपुरवठा करण्यात आला आहे. ३१ जानेवारी १९८८ पर्यंत ७७ टक्के आदिवासी खेड्यांना वीज देण्यात आली आणि आदिवासींच्या ४६,५६७ कृषिपंपांना वीजपुरवठा करण्यात आला. ३१ जानेवारी १९८८ पर्यंत दुर्बल घटकांतील ५,१२,४०४ व्यक्तींना, घरगुती वापरासाठी, वीजजोडणीचा सेवा आकार न घेता वीज देण्यात आली. त्यांपैकी ३,१८,०२९ व्यक्ती नवबौद्ध किंवा अनुसूचित जातींतील आहेत.

२२. अपारंपरिक ऊर्जा साधनांमध्ये सौर ऊर्जेला महत्त्वाचे स्थान आहे. सौर ऊर्जेचा वापर करून २२५ गावांना रस्त्यावरील दिव्यांसाठी वीज देण्यात आली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड येथे पहिले पवनशक्ती केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राने ८.५ लाख युनिटांपेक्षाही अधिक वीज निर्माण केली आहे आणि त्याची क्षमता आता दुप्पट करण्याचे योजले आहे. पवनशक्तीची उपलब्धता निश्चित करण्यासाठी ठाणे

जिल्ह्यातील डहाणू येथे, १९८७–८८ मध्ये, एक नवीन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

२३. कोणतीही कपात करावी न लागता आपल्या राज्याची विजेची संपूर्ण गरज तर पूर्ण झाली आहेच पण त्याखेरीज निर्माण झालेल्या जादा विजेतून कर्नाटक, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश या शेजारच्या राज्यांनाही वीज देण्यात येत आहे. विजेचा संयंत्र भारांक गेल्या वर्षी ५०.०८ होता तो या वर्षी ५६.७४ इतका वाढला आहे, ही अतिशय समाधानाची गोष्ट असून यासंबंधात आणखीही सुधारणा होऊ शकेल याची माझ्या शासनाला जाणीव आहे, आणि त्यादृष्टीने प्रयत्नही करण्यात येत आहेत.

२४. इलेक्ट्रॉनिक उद्योगाला प्रोत्साहन देण्याच्या धोरणाच्या अनुषंगाने इलेक्ट्रॉनिक उद्योगांकरता राज्य शासनाने विशेष प्रोत्साहन योजना जाहीर केली आहे. महाराष्ट्राच्या "मेल्ट्रॉन" ह्या इलेक्ट्रॉनिक विकास महामंडळाने वित्तीय प्रगतीचा एक टप्पा गाठला असून आतापर्यंतचा संचित तोटा भरून काढला आहे. या महामंडळाने, औरंगाबाद येथे कारखाना सुरू केला असून तेथे आपल्या देशात विकसित केलेल्या "सी-डॉट" तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रॉनिक प्रायव्हेट ऑटोमॅटिक ब्रँच एक्स्चेंज (इपीएबीएक्स) यंत्रणेचे उत्पादन करण्यात येईल. राज्यातील लघुउद्योगांना मदत करण्यासाठी केंद्र सरकार आणि जर्मन प्रजासत्ताक गणराज्य यांच्याकडून आर्थिक सहाय्य घेऊन औरंगाबाद येथे ९.६४ कोटी रुपये इतक्या अंदाजित खर्चाने एक हत्यार कार्यशाळा व प्रशिक्षण केंद्र उघडण्यात येईल.

२५. रेशीम उद्योगामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याची क्षमता असल्यामुळे त्याचा विस्तार करण्याचा निर्णय माझ्या शासनाने घेतला आहे. केंद्रीय रेशीम मंडळाने, अपारंपरिक क्षेत्रात सुरू केलेल्या जागतिक बँक प्रकल्पामध्ये महाराष्ट्र राज्याचाही समावेश केला जाईल, अशी अपेक्षा आहे.

२६. राज्यातील औद्योगिक संबंधांमध्ये मागील वर्षापेक्षाही अधिक सुधारणा झाली आहे. १९८७ साली, एकूण ११.३० लाख कामगारांपैकी, संप व टाळेबंदीचा परिणाम ६५,००० कामगारांवर झाला तर १९८६ मध्ये अशा कामगारांची संख्या ८३,००० इतकी होती.

२७. राज्यातील सुमारे ६५ लाख शेतमजुरांच्या किमान मजुरीत वाढ करण्याच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी खासदार, श्री. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती आणि या समितीने अलिकडेच आपला अहवाल सादर केला आहे.

२८. राज्यातील प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी 'खडू-फळा कार्यक्रम' ( ऑपरेशन ब्लॅकबोर्ड ) ही केंद्रपुरस्कृत योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार एक-शिक्षकी शाळांमध्ये आणखी दुसऱ्या शिक्षकाची नेमणूक करण्यात येईल. प्रत्येक प्राथमिक शाळेसाठी योग्य अशी इमारत बांधण्यात येईल व आवश्यक ती साधनसामग्री पुरविण्यात येईल. पहिल्या वर्षी, ५२ गटांमधील विशेषत: शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या जिल्ह्यांमधील शाळांपासून सुरुवात करून टप्प्या-टप्प्याने हा कार्यक्रम अंमलात आणला जाईल.

२९. या वर्षी, शासनाने "शैक्षणिक उठाव" नावाची मोहीम सुरू केली असून, सर्व शाळांच्या इमारतविषयक व इतर सुविधांमध्ये सुधारणा करण्याच्या कामात स्थानिक जनतेचे सहकार्य मिळवणे, हा या मोहिमेचा उद्देश आहे. या मोहिमेला जनतेकडून ५ कोटी रुपयांपेक्षा अधिक स्वयंस्फूर्त देणग्या मिळालेल्या आहेत.

३०. ५,६०० साक्षरता केंद्रांना मंजुरी देऊन या वर्षी माझ्या शासनाने साक्षरता कार्यक्रमाला अधिक चालना दिली आहे.

३१. १९८७ हे वर्ष "बेघरांना निवारा" आंतरराष्ट्रीय वर्ष होते आणि त्या वर्षामध्ये नागरी क्षेत्रांतील गरिबांसाठी असलेल्या घरांच्या संख्येत भरीव वाढ करण्याच्या उद्देशाने माझ्या शासनाने आपले घरबांधणीविषयक धोरण जोमाने राबवण्यास प्रारंभ केला आहे, हे सांगण्यास मला आनंद वाटतो. आपल्याला आठवत असेल की, शासनाने आपल्या पूर्वीच्या धोरणाची फेररचना केली होती व नागरी जमीनधारणा कमाल मर्यादा कायद्याखाली अतिरिक्त ठरलेल्या खाजगी जमिनींपैकी किमान ६५ टक्के जमीन अल्प उत्पन्न गटांना व आर्थिकदृष्टया दुर्बल गटांना परवडण्याजोगे निवासी गाळे बांधण्यासाठी वापरण्यात यावी असे ठरवून दिले होते. या ६५ टक्के जमिनीवरील गाळयांपैकी सुमारे ८० टक्के गाळे प्रत्येकी २५,००० रुपयांपेक्षाही कमी किंमतीला विकण्यात येतील. या नवीन धोरणाच्या अनुरोधाने सुमारे ५,००० अर्ज आलेले आहेत. त्यांपैकी आतापर्यन्त ५९० अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. शासन उर्वरित अर्जाबाबत त्वरित निर्णय घेणार असून आगामी पाच ते सहा वर्षांमध्ये, उपलब्ध अतिरिक्त जमिनीवर सुमारे ७१ लाख निवासी गाळे बांधले जातील असा अंदाज आहे. योजनेखालील निधी, पंतप्रधानांचे अनुदान आणि जागतिक बँकेचे सहाय्य मिळणारे प्रकल्प यांच्या माध्यमातून झोपडपट्टयांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा व त्यांचा दर्जा सुधारण्याचा कार्यक्रम अधिक जोरदारपणे राबवण्यात येईल व त्याचा लाभ आगामी वर्षी सुमारे ५ लाख व्यक्तींना मिळेल.

३२. हुंडयासारख्या घातक प्रथेची झळ लागलेल्या महिलांकरिता भोजन व निवासाची व्यवस्था करण्यासाठी आणि त्यांना कायदेविषयक, वैद्यकीय व व्यवसाय-विषयक सहाय्य पुरविण्यासाठी "माहेर" या नावाची नवीन योजना राज्याच्या सहा विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी सुरू करण्यात आली आहे.

३३. सफाई कामगार समितीचा अहवाल शासनाने मान्य केला असून त्यानुसार सफाई कामगारांसाठी गृहनिर्माण, शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण यांकरिता निधी राखून ठेवण्यात येईल. मेहतर आणि सफाई कामगार यांच्यासाठी एक प्रशिक्षण व पुनर्वसन केंद्र उघडण्याचे ठरवले आहे.

३४. राज्यात प्रथमच सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथे अपंग व्यक्तींची जनगणना करण्यात आली होती. या पथदर्शक प्रकल्पाच्या धर्तीवरील प्रकल्प आता संपूर्ण राज्यभर सुरू करण्यात येतील.

३५. राज्यातील तीन मागास वर्ग विकास महामंडळांकडून राबवण्यात येणाऱ्या विकास योजनांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी एक मागास वर्ग विकास प्राधिकरण निर्माण करण्याचे ठरवले आहे. या तिन्ही महामंडळांचे स्वतंत्र अस्तित्व या प्राधि-करणाखाली अबाधित राखण्यात येईल.

३६. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाने, १९८६–८७ पासून मोठ्या प्रमाणावर प्रगती केली आहे. आश्रमशाळांच्या एकूण व्यवस्था-पनातही सर्वंकष सुधारणा झालेली आहे. १९८५–८६ मध्ये, आश्रमशाळांमधील आदिवासी विद्यार्थ्यांचे माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ३३ टक्के होते, ते १९८६–८७ मध्ये ४१ टक्के इतके वाढले आहे. संपूर्ण राज्याची एकूण टक्केवारी पहाता हे प्रमाण समाधानकारक आहे.

३७. अवर्षणप्रवण भागातील बेसुमार जंगलतोड झालेल्या वनजमिनींवर आणि पडीत जमिनींवर मोठया प्रमाणात वनरोपण करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. १९८७ मध्ये, अशा १.१३ लाख हेक्टर जमिनीवर वनरोपण करण्यात आले होते, तर या वर्षी २.४४ लाख हेक्टर जमीन एवढे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. "किसान रोपवाटिका" योजनेद्वारेही झाडे लावण्याच्या कार्यक्रमाला प्रोत्साहन देण्यात येत आहे.

३८. राज्याच्या ११ जिल्ह्यांमध्ये सार्वत्रिक लसटोचणी कार्यक्रम राबवण्यात येत असून, १९९० सालापर्यंत सर्व जिल्हे या कार्यक्रमाखाली संपूर्णपणे आणले जातील.

शासनाने, लिंगनिदान चाचण्यांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला असून या प्रयोजनार्थ एक विधेयक विधानमंडळापुढे मांडण्याचे योजले आहे. शासनाने कर्करोग नियंत्रण कार्यक्रम हाती घेतला असून सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये आणि महिला रुग्णालयांमध्ये, तसेच, निवडक प्रसवोत्तर शुश्रूषा केंद्रांमध्ये "पॅप्स-स्मिअर" चाचणीची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. कर्करोग नियंत्रण कार्यक्रमाचा एक भाग म्हणून शासनाने धूम्रपानाविरुद्ध एक सार्वत्रिक मोहीम सुरू केली असून सर्व शासकीय, निमशासकीय व स्थानिक संस्थांची कार्यालये, आस्थापना, संस्था आणि शासकीय उपक्रम या ठिकाणी धूम्रपानावर बंदी घातली आहे. पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयात बालरोग-चिकित्सा विभाग सुरू करण्यात आला असून मुंबई येथील ज. जी. रुग्णालयांमध्ये सिने-अँजिओग्राफी यंत्र आणि कामा व आल्ब्लेस रुग्णालयात अल्ट्रासॉनिक यंत्र बसविण्यात आले आहे.

३९. वैद्यकीय सुविधांत आणखी वाढ करण्यासाठी, पुढील वर्षी, औरंगाबाद व अंबेजोगाई येथील वैद्यक महाविद्यालय रुग्णालयांमध्ये दुसरे कोबाल्ट युनिट बसविण्याचे योजण्यात आले आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून नांदेड येथे वैद्यक महाविद्यालय सुरू करण्याचे ठरवले आहे. तसेच नागपूर येथे वैद्यकशास्त्र पदव्युत्तर संस्थेच्या इमारत-बांधणीला प्रारंभ झाला आहे.

४०. महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी हौतात्म्य पत्करलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना, १ मे १९८५ पासून, स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणेच निवृत्तिवेतन व इतर आर्थिक सहाय्य मंजूर करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्याचप्रमाणे, आर्य समाज चळवळीत भाग घेतलेल्या व त्यासाठी एक महिना किंवा त्यापेक्षा अधिक कारावास भोगलेल्या व्यक्तींनाही १ मे १९८५ पासून निवृत्तिवेतन व इतर आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येईल. दिवंगत स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नीला/पतीला, शासनाने, १९८६–८७ पासून प्रतिवर्षी ५०० रुपयांचे प्रवास अनुदान देण्याचे ठरविले आहे.

४१. १९८८–८९ या वर्षी, १,५०० सामूहिक दूरदर्शन संच बसविण्याचे शासनाने ठरविले आहे.

४२. आपल्या मुख्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र कर्नाटक सीमावादावर लवकरात लवकर तोडगा शोधून काढण्याची निकड व्यक्त करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट घेतली होती. माझ्या शासनाने, सीमा भागातील कन्नड शाळांत मराठी शिकविणे सक्तीचे न करण्याची आणि सीमा भागातील मराठी भाषिकांसाठी महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये २० जागा राखून ठेवण्याची कृती करून याबाबत आधीच पुढाकार घेतला आहे आणि गेल्या

वर्षी वैद्यक महाविद्यालयांतूनही त्यांच्यासाठी पाच जागा राखून ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. माझ्या शासनाने , कर्नाटक शासनाला अशाच प्रकारची कार्यवाही करण्याबद्दल आणि विशेषत: सीमा भागातील मराठी शाळांत कन्नड शिकवण्याची सक्ती न करण्याबद्दल वारंवार विनंती केली आहे. तथापि, तसे करण्याबाबत दोन्ही राज्ये सहमत झालेली असूनही कर्नाटक शासनाने अद्याप कोणतीही कृती केलेली नाही.

४३. सन्माननीय सदस्यहो, या अधिवेशनामध्ये आपल्याला, पूरक मागण्या, अर्थसंकल्प, लेखानुदान, काही अध्यादेशांचे अधिनियमांत रूपांतर करणारी विधेयके, प्रलंबित व निकडीच्या स्वरूपाची नवीन विधेयके, त्याचप्रमाणे तातडीचे, शासकीय तसेच अशासकीय स्वरूपाचे अन्य कामकाज यांच्यावर विचारविमर्श करावयाचा आहे.

या अधिवेशनामधील आपल्या विचारविमर्शात मी आपणास सुयश चिंतितो.

जय हिंद.